K. S. Wani Memorial Trust
NEWS LETTER
Editorial Committee :
Prof. Dr. Shobha Shinde (Chief Editor)
Ms. Vaishali Songire (Asst. Editor) &
Prof. Mr. Prasad Puranik (Co-Editor)

Volume No.25 | April – June 2024 | K. S. Wani Memorial Trust Reg. No.E352

Printing Institute News

संस्थेच्या कर्मचाऱ्यांशी साधला सुसंवाद !

का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री शशिकांत धामणे व संस्थेचे विश्वस्त श्री जितेंद्र सोनगिरे यांनी २४ जून रोजी संस्थेच्या विविध उपक्रमातील कर्मचारी वर्गाशी सुसंवाद साधून त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या व कर्मचार्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विभाग प्रमुखांनी आपली भूमिका मांडली, यावर्षी सर्व कर्मचार्यांना वाढती महागाई लक्षात घेऊन पगार वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याबद्दल सर्व कर्मचारी वृन्दातर्फे विश्वस्त मंडळाचे आभार मानले.



माननीय अध्यक्ष सोबत कर्मचारी वृन्द



श्री जितेंद्र सोनगिरे यांचे विश्वस्त मंडळातर्फे हार्दिक अभिनंदन!

६ वे प्रिंट ऑलम्पियाड २०२४ वेस्ट झोन राउंड पुणे विद्यार्थी गृहाचे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे संपन्न झाले. प्रिंटींग क्षेत्रातील देशपातळीवर टॅलेंट हंट शोधणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असून प्रिंटींग क्षेत्रातील भीष्म पितामह म्हणून ओळख असलेले मा. श्री कमल चोप्राजी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करत असतात, यात ज्युरी सदस्य म्हणून उपस्थित राहण्याची संधी आपल्या मुद्रण शिक्षण संस्थेचे कोर्स कॉर्डिनेटर श्री जितेंद्र सोनगिरे यांना मिळाली, ही संस्थेसाठी गौरवाची बाब आहे. त्याबद्दल श्री जितेंद्र सोनगिरे यांचे विश्वस्त मंडळातर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

यावेळी श्री कमल चोप्रा यांनी आगामी नवीन उपक्रमात संस्थेस देखील सहभागी करून घेण्याबाबत श्री सोनगिरे यांनी आवाहन केले. या कार्यक्रमाचा ग्र्यांडफिनाले आयोध्या येथे आयोजित केला जाणार आहे.



विद्यार्थ्यांची यशोगाथा

माझे नाव योगेश नानाभाऊ देसले, मी मुळचा माळीच ता. शिंदखेडा, जिल्हा धुळे येथील रहिवासी. मी २००८ साली कला शाखेतून इयत्ता बारावीची परीक्षा पास झालो. माझे आई-वडील शेतात काम करून आपला उदरनिर्वाह चालवत. आम्ही तीन भावंडे त्यात मी सर्वात मोठा, मला पुढे महाविद्यालयीन उच्च शिक्षण देण्यास वडिलांनी असमर्थता दर्शवली. मला लवकर रोजगार प्राप्त व्हावा व मी कुटुंबाला आधार द्यावा यासाठी त्यांनी मला समजवून सांगितले परंतु फक्त बारावी होऊन काय काम मिळणार ? मी थोडासा नाराज होतो परंतु माझ्या चुलत भावाने मला मुद्रण शिक्षण पदविका करण्याचा सल्ला दिला तो एका इंक कंपनीत नोकरीस होता त्याला या क्षेत्राविषयी माहिती होती.

त्याने मला धुळे येथील का. स. वाणी संस्थेत मुद्रण तंत्रकला पदविका अभ्यासक्रमाविषयी सांगितले व मी प्रवेश घेण्याचे निश्चित केले. २०१० साली मी पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. मला खोपोली येथील पोझीटिव्ह पैकेजिंग या कंपनीत जॉब मिळाला माझ्या आई वडिलांना खूप आनंद झाला. पण घरची परिस्थिती बदलायची असेल तर परदेशात जावून काम केले पाहिजे असा ध्यास माझ्या मनाने घेतला मी जॉब साठी प्रयत्न करू लागलो मला २०१३ च्या मार्च महिन्यात इंटिग्रेटेड प्लास्टिक प्याकेजिंग या दुबईच्या कंपनीत १० लक्ष रुपयांच्या वार्षिक पॅकेजने नोकरी मिळाली. माझे परदेशात काम करण्याचे स्वप्न पूर्ण झाले. मी सुमारे तीन वर्ष दुबईत वास्तव्यास होतो नंतर मी गुजराथ येथील क्रिश प्याकेजिंग या भारतातील ग्रुप मध्ये परत आलो व आज मी गेल्या पाच वर्षांपासून सायटेक कोटिंग प्रा. लिमिटेड या सारीगम ,गुजराथ या कंपनीत इंक टेक्निकल सर्व्हीस व मार्केटिंग मैनेजर म्हणून ११ लक्ष रुपये प्रती वर्ष इतक्या वेतनावर कार्यरत आहे. मला संस्थेतून अतिशय मोलाचे मार्गदर्शन व शिक्षण प्राप्त झाले त्याबद्दल मी संस्थेच्या सर्व शिक्षक वृंद व पदाधिकार्यांचा ऋणी आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ जगन्नाथ वाणी यांनी ही संस्था सुरु केली त्यामुळे मी शिक्षण घेऊ शकलो त्यांना मी अभिवादन करतो व संस्थेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देतो.

चालू शैक्षणिक वर्षापासून गरीब व गरजू विद्यार्थ्यांना संस्थेची विशेष शिष्यवृत्ती योजना

का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जगन्नाथ वाणी यांचे सुपुत्र व संस्थेचे विद्यमान विश्वस्त श्री श्रीराम जगन्नाथ वाणी तसेच विश्वस्त श्री विवेक रघुनाथ केले यांनी दोघांनी दिलेल्या भरीव देणगी रकमेच्या व्याजातून संस्थेतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यासंदर्भात काही महत्वपूर्ण नियम ठरविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन कोणत्याही जाती धर्मातील गरीब विद्यार्थ्याना शिष्यवृत्ती विना परतावा (कायमस्वरुपी) देण्यात यावी असे ठरले. या योजनेची विद्यार्थ्यांना माहिती दिली असता विद्यार्थ्यांनी व पालकांनी आनंद व समाधान व्यक्त केले.

खानदेशचा सांस्कृतिक इतिहास - पहिला खंड प्रकाशनाच्या मार्गावर

का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेतर्फे खानदेशचा सांस्कृतिक इतिहास प्रकल्पांतर्गत नव्याने पुनर्मुद्रित सात खंडांपैकी खानदेशातील बोलीभाषा खंड १ पुढील ऑगस्ट महिना अखेर प्रकाशित करण्यात येणार असल्याचे संस्थेच्या संचालक व प्रकल्प प्रमुख डॉ वंदना महाजन यांनी कळविले आहे . संस्थेच्या सचिव डॉ शोभा शिंदे यांचे या प्रकल्पासाठी बहुमोल मार्गदर्शन लाभत आहे .

रेऊ कथा स्पर्धा संपन्न

निरामय पब्लिक च्यारीटेबल ट्रस्ट संचलित मिळून सार्याजणी अंकात रेऊ कथा स्पर्धेचे गेल्या १५ वर्षांपासून आयोजन करण्यात येत आहे. अलीकडे रेऊ कथा स्पर्धा अनेकांच्या जिव्हाळ्याची स्पर्धा झाली आहे. स्पर्धेसाठी २०२३-२०२४ या वर्षी सुमारे १३० स्पर्धकांनी उत्स्फूर्त पणे सहभाग नोंदविला. राजमाता जिजाऊ आणि विद्या बाळ यांच्या जयंती निमित्त रेऊ कथा स्पर्धेतील स्पर्धकांना सन्मान चिन्ह व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. ग्रामीण भागात स्पर्धा पोहचविण्यासाठी प्रतिनिधी मार्फत विशेष प्रयत्न सुरु आहेत. या वर्षी या स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून जेष्ठ लेखिका प्रा. आशालता कांबळे लाभल्या. स्पर्धेला लाभेलेला प्रतिसाद पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.




रेऊ कथा स्पर्धेतील पारितोषिक विजेते स्पर्धक

एम. ए. मराठीच्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संस्थेस भेट

नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटी अंतर्गत शैक्षणिक व सामाजिक संस्थेस भेट देऊन संस्था परिचय करून घेणे व क्षेत्र भेट अहवाल सादर करणे अभ्यासक्रमात अनिवार्य केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून धुळे जिल्हा व परिसरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संस्थेस भेट दिली त्यात प्रामुख्याने शिरपूर येथील एस. पी. डी. एम. महविद्यालय व श्रीमती एच. आर. पटेल महिला महाविद्यालय , कुसुंबा येथील श्रीमती एन. एन. सी. महाविद्यालय, नगाव येथील गंगामाई एज्युकेशन सोसायटीचे वरिष्ठ महविद्यालय तसेच धुळे येथील विद्यावर्धिनी महाविद्यालय अशा ख्यातनाम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संस्थेत सुरु असलेल्या उपक्रमांविषयी माहिती जाणून घेतली. मुद्रण शिक्षण विभागाचे विभाग प्रमुख प्रा. प्रसाद पुराणिक यांनी संस्थेची विस्तृत माहिती दिली तसेच श्री मिलिंद दीक्षित यांनी ग्रंथालय विभागाची माहिती देऊन आमची श्रीवाणी अंकाचे वर्गणीदार व ग्रंथालय सभासद होण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी एम. आय. डी. सी. येथील उत्पादन विभागास भेट देऊन आधुनिक छपाई तंत्रज्ञानाची माहिती जाणून घेतली. यावेळी विद्यार्थ्यांसोबत उपक्रम प्रमुख प्रा. डॉ . फुला बागुल , प्रा.डॉ. शारदा मोरे , प्रा. डॉ. जितेंद्र गिरासे , प्रा. डॉ . गायकवाड, प्रा. डॉ. प्रशांत लगडे, प्रा. डॉ ममता सोनवणे, प्रा. रोहित वाडीले, प्रा. युवराज पवार आदी उपस्थित होते. संस्थेच्या कार्याविषयी व विविध उपक्रमांविषयी विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.



भेट देण्यास आलेले विविध महाविद्यालयातील विद्यार्थी

रेऊ वाणी विज्ञान विहार

रेऊ वाणी विज्ञान विहार प्रयोग प्रवेश परीक्षा

रेऊ वाणी विज्ञान विहाराच्या प्रयोग वर्गात हुशार व गुणीआवड असणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करिता यावी यासाठी दरवर्षी प्रवेश परीक्षा घेण्यात येते. यंदाही दिनांक ३० जून २०२४ रोजी ही परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी ५९३ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी प्रत्येक वर्गाचे २० विद्यार्थी याप्रमाणे १२० विद्यार्थ्यांनी विज्ञान विहारात प्रवेश घेतला. सदर विद्यार्थ्यांना प्रत्येक रविवारी दोन प्रयोग व महिन्याच्या शेवटच्या रविवारी नवनवीन विषयावर गेस्ट लेक्चर आयोजित केले जाते. याप्रमाणे वर्षभरात ५० प्रयोग व १० वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थी येथे वर्षभरात घेतात.



विज्ञान वर्गाचे प्रवेश देतांना परीक्षा

विज्ञान वर्गाचे वर्ग घेतांना

दिनांक ७ जुलै २०२४ पासून रेऊ वाणी विज्ञान विहाराच्या प्रयोग वर्गाला सुरूवात करण्यात आली. प्रयोगातच सिलॅबस ठरवताना आयसीएससी सीबीएससी, एनसीआरटी, स्टेट बोर्ड या चारही बोर्डाचा विचार करून प्रत्येक वर्गाचे ५० प्रयोग विद्यार्थ्यांना शिकवण्यात येणार आहे त्यामळे स्पर्धा परीक्षेला प्रयोग वर्गाच्या सिल्याबसची विद्यार्थ्यांना मदत होते.



COEP इंटरनशिप विद्यार्थी शंतनु केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना

दरवर्षी रेऊ वाणी विज्ञान विहारात डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेची तयारी करून घेण्यासाठी क्लासेस घेतले जातात यंदाही इयत्ता सहावी व नववीचे क्लासेस घेण्यात येत आहे. प्रथम वर्गासाठी इयत्ता सहावीचे १० विद्यार्थी व इयत्ता नववीचे ४ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून त्यांचे १५ मे पासून वर्ग सुरू आहे.



COEP इंटरनलशिप विद्यार्थी शंतनु केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना

बालनेत्र सुरक्षा प्रकल्प

विटा भट्टीच्या मुलांना शिक्षण व पोषण आहार

एप्रिल ते जून या कालावधीत शाळेत परीक्षा, उन्हाळी सुटी असल्यामुळे डोळे तपासणीचे काम करता येत नाही. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही उन्हाळी सुट्टीत विटाभट्टीवरील मुलांना शिकविण्याचे व पोषण आहार देण्याचे काम करण्यात आले. या विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करण्याकरिता विविध गमतीदार खेळ घेण्यात आले. अक्षर ओळख व अंक ओळख यावरोबर त्यांच्या इतर विषयातील ज्ञानाच्या कक्षा वृद्धिगत व्हाव्या या उद्देशाने चवदार चॉकलेट, आवडते आईस्क्रीम, हसण्यामागचे विज्ञान इ. विज्ञानावर आधारित गोष्टी सांगून विज्ञानविषयाबाबत जिज्ञासा निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यांच्या बालमनाचे मनोरंजन व शब्दभंडार वाढावे याकरिता मोबाईलवर विविध गाणे जसे चल रे भोपळा टुणूक टुणूक, 'ससा व कासव', 'एका माकडाने काढले दुकान' इत्यादी गाणे मधल्या सुट्टीत दाखविण्यात आले. अभ्यास करताना मागील तीन ते चार वर्षापासून शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रगती चंगली असल्याचे लक्षात आले. मुलांना अक्षर व अंक ओळख येऊ लागले आहेत. बेरीज, वजाबाकी, बाराखडी येऊ लागली आहे काही मुलांना वाचता येऊ लागले आहे. अभ्यास, जेवण, खेळ, मनोरंजन व शेवटी प्रार्थना असा नित्यक्रम ठरवून रोज चार तास हे विद्यार्थी सहवासात असत. विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने, चांगला अभ्यास केल्याबद्दल कोणाला टोपी कोणाला ड्रेस बक्षीस म्हणून देण्यात आले.



विद्यार्थ्यांकडून अभ्यास करून घेताना



पोषण आहार, फळांचा आस्वाद व खेळ खेळताना विद्यार्थी



बालमनाचे मनोरंजन



बोधपर कथा ऐकताना



डॉ. दिपाली महाजन व चिन्मय वाघमारे विद्यार्थ्यांना बक्षीस देताना

एप्रिल ते जून या कालावधित शारदा नेत्रालयात एकूण चार विद्यार्थी येवून गेले. एकुण चार विद्यार्थ्यांची नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आली. यामध्ये मोतीबिंदू चे एक व तीरळेपणाचे तीन यांचा समावेश आहे.



शस्त्रक्रियेपूर्वी शस्त्रक्रियेनंतर



शस्त्रक्रियेपूर्वी शस्त्रक्रियेनंतर

	एप्रिल ते जून २०२४	३० जून २०२४ पर्यंत
Screened	-	१००७८७
Spect (School Camp)	-	१६७
Refer (School)	-	४५४९
Visited	४	६०७
Surg. Suggested	१	५५
Surg. done	४	४०
G.P. given (S.N.)	४	३१७
Higher Centre	-	१३
Patch	-	३४
Cornea / Retina	-	११
Follow Up / medicine given	-	११८

विटाभट्टी वरील विद्यार्थ्यांना कपडे वाटप

बालनेत्र सुरक्षा प्रकल्पा अंतर्गत उन्हाळी सुट्टीत विटा भट्टीवरील विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम करत असताना असे लक्षात आले की या विद्यार्थ्यांना अंगावर नीट कपडे नाही. फाटलेल्या कपड्याची लाज वाटत असल्यामुळे काही मुलं अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करू शकत नाही हे लक्षात आल्यावर कर्मचारी वर्गाने या मुलांसाठी कपडे गोळा करून त्यांच्या वयानुसार त्याचे वाटप केले . जेणेकरून शिकताना त्यांच्या अंगावर व्यवस्थित अंगभर कपडे असतील व त्यांचा आत्मविश्वास वाढेल.



उन्हाच्या वेळेस विठा भट्टी काम करतांना मुलांचे संरक्षण व्हावे या उद्देशाने टोपी वाटप

स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन संस्था पुणे - उपक्रम

"सा" संस्थेमार्फत जागतिक स्किझोफ्रेनिया दिन साजरा

"सा" संस्थेमार्फत दरवर्षी जागतिक स्किझोफ्रेनिया दिन साजरा करण्यात येतो. यावर्षी जागतिक स्किझोफ्रेनिया दिनाचा विषय कम्युनिटी काईंडनेस (Community Kindness) हा असल्याने डॉ. शिरीषा साठेंनी कार्यक्रमाची सुरुवात त्याला अनुसरून केली. या वेळी आयोजित चर्चासत्रात डॉ विद्याधर वाटवे यांनी मानसिक आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व प्रोफेशनल्सनी एकत्रित येऊन काम करण्याची गरज आहे असे आव्हान केले. तसेच मोठ्या हॉस्पिटलमध्ये सायकॅट्रिक डिपार्टमेंटमध्ये ऍडमिट करून घेण्याची सोय असावी अशी इच्छा व्यक्त केली. मेंटल हेल्थ केअर ऍक्ट २०१७ हा कायदा मानसिक आजारी व्यक्तींच्या दृष्टिकोनातून बनवण्यात आला आहे जो की सायकॅट्रिस्ट किंवा डॉक्टरांच्या दृष्टिकोनातून असणे गरजेचे आहे असेही त्यांनी सांगितले. डॉ. निश्चल रावल यांनी मानसिक आजारी व्यक्तीचा डॉक्टरांवर विश्वास असणे गरजेचे आहे. असे मत व्यक्त केले, तसेच ते म्हणाले प्रत्येक प्रोफेशनल्सला त्याच्या शिक्षणाप्रमाणे मान देणे हे तितकेच आवश्यक आहे. त्यांच्या मते इतर आजाराची जशी आपण औषध घेतो त्याचप्रमाणे मानसिक आजाराचीही औषधे घ्यायला हवीत.



स्किझोफ्रेनिया दिनानिमित्त आयोजित चर्चासत्रात सहभागी मान्यवर



'बेला के फूल' कार्यक्रम

स्व.डॉ. जगन्नाथ वाणी यांचा स्मृतीदिन साजरा

६ मे २०२४ रोजी डॉ वाणी यांचा सातवा स्मृतिदिन शुभार्थींनी भक्तिगीते सादर करुन व त्यांना आदरांजली अर्पण करून साजरा केला. डॉ. वाणी हे संगीत प्रेमी होते त्यामुळे श्री अभय आगाशे यांच्या 'बेला के फूल' या व्हायोलिन वादनाचा कार्यक्रम देखील यावेळी आयोजित करण्यात आला होता. संस्थेमार्फत डॉ. वाणी यांना आदरांजली अर्पण करण्यात आली यावेळी डॉ. वाणी यांच्या परिवारातील सदस्यांनी देखील त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.


"सा" संस्थेत जागतिक योगदिन साजरा

२१ जून रोजी "सा" संस्थेत जागतिक योग दिन साजरा करण्यात आला यावेळी शुभार्थींनी योग अभ्यासाच्या आवश्यक गोष्टी जाणून घेतल्या व त्यानंतर स्वतः विविध योगासनांचे प्रात्यक्षिक केले. प्रत्यक्ष कृतीतून योग अभ्यास करायला मिळाल्याने शुभार्थी आनंदी होते .





जागतिक योग दिन साजरा

स्व. सूर्यकांत काशिनाथ केले यांना भावपूर्ण श्रद्धांजली



का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जगन्नाथ वाणी यांचे लहान बंधू स्व. सूर्यकांत काशिनाथ केले उर्फ भैय्याकाका यांना ११ मे २०२४ रोजी वयाच्या ७५ व्या वर्षी देवाज्ञा झाली. संस्थेविषयी व संस्थेच्या कर्मचार्यां विषयी त्यांना खूप आस्था व प्रेम होते. त्यांच्या जाण्याने केले परिवारास अतीव दु:ख झाले आहे . त्यांच्या आत्म्याला चीर:शांती लाभो हीच का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे विश्वस्त, पदाधिकारी व कर्मचार्यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

स्व. श्री. जितूभाई दुतिया यांना भावपूर्ण श्रद्धांजली



स्व. श्री. जितूभाई दुतिया यांना ८ जून २०२४ रोजी देवाज्ञा झाली. ते शारदा नेत्रालयाशी सुरुवातीपासून संलग्न होते. त्यांनी मुंबई येथील रामजी अशर शाळा व धुळे येथील शारदा नेत्रालयाचे विश्वस्त अशी पदे भूषविली. त्यांनी आपल्या सात्विक विचाराने सहकारी व कर्मचाऱ्यांच्या मनावर अधिराज्य गाजविले. तत्वनिष्ठ,सत्वशील, ध्येयवादी, निष्ठावंत, निष्कलंक, युगपुरुष, तसेच कोणतेही काम तत्परतेने पूर्णत्वास नेणे हा त्यांचा स्वभाव होता. डॉ. जयंत शाह स्वर्गवासी झाल्यानंतर शारदा नेत्रालयाची धुरा त्यांनी सांभाळली व त्यांच्या मार्गदर्शनाखाली शारदा नेत्रालयाने प्रगती केली. शारदा नेत्रालयास आशियातले सर्वात मोठे डोळ्याचे हॉस्पिटल "अरविंद डोळ्याचे हॉस्पिटल, मदुराई" यांचे मार्गदर्शन लाभले तेही जितूभाईच्या भेटी व पुढाकारामुळेच. पितामह भीष्म म्हणून ओळख असणारे. आदरणीय श्री. स्व. जितूभाई दुतिया यांना त्रिवार वंदन व का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे विश्वस्त, पदाधिकारी व कर्मचार्यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली. भावपूर्ण आदरांजली !!!

शारदा नेत्रालय OPD रिपोर्ट

Period	Paid	Review Free	Express OPD	Subsidzed	Retina OPD	Paediatric OPD	Total
1st April'24 to 30th June'24	8092	3118	457	820	645	71	***13203***

OT DETAILS (Surgery Details)

Period	SICS Free	SICS Paid	Phaco	Retina	Other	Paediatric	Total
1st April'24 to 30th June'24	569	353	812	52	220	8	***2014***

का. स. वाणी स्मृति प्रतिष्ठान, धुळे
विद्यमान विश्वस्तांची यादी

मा.सी.ए.श्री.शशिकांत धामणे (अध्यक्ष)
मा. प्रा.डॉ. शोभा शिंदे (सचिव)
मा. डॉ.के.बी. पाटील
मा. श्री. श्रीराम जगन्नाथ वाणी
मा. प्रा.डॉ. नटवरलाल जैन
मा. श्री. श्रीपाल मुणोत
मा. श्री. विवेक केले
मा. श्री. जितेंद्र सोनगिरे

We accept donations from well-wishers

K.S.Wani Memorial Trust
Current Account No. 48310010006917
IFSC Code IBKL0000483
IDBI Bank, Dhule (Maharashtra)

Reg. No. K.S. Wani Memorial Trust. No. E352/Dhule
FCRA Reg. No. 083820024
PAN No. AAATK9380K

Contact: K. S. Wani Memoral Trust,
Unnati Nager Nakane Road Deopur Dhule- 424002
(02562)223654, 9372810477
Email Id: kswmarathi@gmail.com
Please Visit: www.kswtrust.org